# बॉन्ड... जेम्स बॉन्ड...!

# *A to Z*

**श्रीकांत मुंदरगी**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**बॉन्ड... जेम्स बॉन्ड...!** A to Z
श्रीकांत मुंदरगी



© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
श्रीकांत मुंदरगी
'शिल्पसंकेत'
श्री मातोश्री गणेश मंदिरामागे,
नागाळापार्क, कोल्हापूर - ४१६००३
फोन नं. ०२३१-२६५३८२८ मो. नं. : ९३७००२८०७४

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

## लेखकाचा अल्प परिचय

श्रीकांत मुंदरगी गेली बेचाळीस वर्षं कोल्हापुरात जनरल आणि प्लास्टिक सर्जन म्हणून कार्यरत आहेत. लेखन, चित्रकला, अभिनय, फोटोग्राफी आणि बॅडमिंटन हे त्यांचे आवडीचे छंद. त्यांच्या घरी दुर्मीळ पुराण वस्तूंचा संग्रह असून त्यांची स्वत:ची आर्ट गॅलरीही आहे. 'इंडियन एक्स्प्रेस', 'इलस्ट्रेटेड वीकली', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स', 'सकाळ', 'तरुण भारत', 'केसरी', 'पुढारी' इत्यादी वृत्तपत्रांतून आणि आघाडीच्या अनेक दिवाळी अंकांतून त्यांनी विविध विषयांवर लेखन केलं आहे. आजवर त्यांनी चारशेच्यांवर समाजप्रबोधनात्मक भाषणं केली आहेत. अभिनय आणि नाट्यदिग्दर्शन या क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. दूरदर्शनवर पुरस्कृत मालिकांचा प्रारंभ झाला, त्या काळात डॉक्टरांची 'जॉकी' ही चाकोरीबाह्य मालिका प्रदर्शित झाली होती.

हार्ट ॲटॅक या विषयावर त्यांनी सखोल संशोधन केलं आहे. सदर विषयावर लघुपट बनवण्यात आला आहे. या विषयावर व्हिडिओ आणि ऑडिओ कॅसेटही काढण्यात आल्या आहेत. व्याधीविकार आणि जरामरणावर मात करणारे स्टेमसेल्स या विषयाचा त्यांनी सविस्तर अभ्यास करून आणि युरोप-अमेरिकेतील अनेक रिसर्च इन्स्टिट्यूट्सना भेटी देऊन त्यावर अनेक माध्यमांतून लेखमालिका प्रकाशित केल्या आहेत. नॅनोटेक्नॉलॉजी आणि स्टेमसेल्स या विषयांवर पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांची गाईड म्हणून निवड करण्यात आली आहे.

डॉक्टरांनी अनेक नामवंत व्यक्तींच्या वैयक्तिकरीत्या मुलाखती घेतल्या आहेत. त्यांनी अमिताभ बच्चन या महानायकाची त्याच्या घरी जाऊन घेतलेली मुलाखत काही वर्षांपूर्वी बरीच गाजली होती आणि आजवर ती निरनिराळ्या माध्यमातून लहानमोठ्या फॉरमॅटमध्ये प्रसिद्धही झाली आहे. १९७२ साली अमेरिकेत युस्टन टेक्सासमध्ये शिकत असताना ते 'नासा'ला भेट देण्यासाठी गेले होते. त्या वेळी चंद्रावर पाऊल टाकणारा पहिला माणूस नील आर्मस्ट्राँग याला भेटून त्याच्याशी चार शब्द बोलण्याचं भाग्य त्यांना लाभलं. स्व. बाबा आमटे, मदर तेरेसा, ऑस्कर

विजेत्या भानू अथैया यांच्याही मुलाखती डॉक्टरांनी घेतल्या आहेत. टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत कुस्तीचं ब्राँझपदक पटकावणाऱ्या पै. खाशाबा जाधव यांची अॅपेंडिक्सची शस्त्रक्रिया करण्याचं श्रेयही त्यांच्या खाती जमा आहे.

कथासंग्रह, कादंबऱ्या आणि चरित्रं अशी अनेक पुस्तकं डॉक्टरांनी लिहिली असून त्यांनी अलीकडंच लिहिलेलं 'मधुबाला' हे पुस्तक अतिशय वाचकप्रिय ठरलं आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मधुबालाचं चरित्रात्मक पुस्तक आवडल्याचं अक्षरश: हजारो वाचकांनी फोन, एसएमएस आणि पत्राद्वारे कळवलं. इतकंच नव्हे तर चित्रपटसृष्टीतल्या काही नामवंत कलावंतांवर लिहावं अशी आग्रहाची विनंती केली. त्या विनंतीला मान देऊन डॉक्टरांनी 'जेम्स बॉन्ड' आणि 'मार्लिन मन्रो' या दोन विषयांवर लेखन केलं आहे. ही दोन्ही पुस्तकं रिया पब्लिकेशन्सतर्फे प्रकाशित होत आहेत. 'मीनाकुमारी' आणि 'वॉल्ट डिस्ने' या विषयांवर लेखन चालू आहे. 'फूलनदेवी', 'बेनझीर भुट्टो' आणि 'दुसऱ्या महायुद्धातील धुरंधर व्यक्ती आणि कथा' ही रिया पब्लिकेशन्सनं प्रकाशित केलेली पुस्तकंही वाचकांना आवडली आहेत. 'वाळूत उमललेलं फूल' हे अत्यंत वेगळ्या विषयावरील पुस्तक वाचकांना आवडलं आहेच शिवाय ते विविध पुरस्कारांनी सन्मानित झालं आहे.

शिक्षण, संशोधन आणि कॉन्फरन्सेसच्या निमित्तानं डॉक्टरांनी जगातील बहुतांशी देशांचे दौरे केले असून त्यांना विविध क्षेत्रातील कार्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

डॉक्टरांच्या वैद्यकीय कार्यासह अनेक क्षेत्रांतील कामगिरीत त्यांच्या पत्नी सौ. सुहासिनी यांचं मोलाचं सहकार्य लाभल्यामुळंच डॉक्टरांना भरीव यश मिळवणं शक्य झालं आहे. अनुभवसंपन्न, सुसंस्कृत आणि समृद्ध जीवन जगणाऱ्या या दांपत्याला दोन मुली आणि दोन मुलं असून त्या सर्वांनी भारतात आणि परदेशात आपापल्या क्षेत्रात उत्तम नावलौकिक मिळवला आहे.

✦✦✦

# प्रस्तावना

चित्रपटसृष्टीतील महानायिका 'मधुबाला' हे रिया पब्लिकेशन्सनं प्रकाशित केलेलं पुस्तक इतकं अफाट लोकप्रिय होईल, असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं; पण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मला रोज दोन ते तीन फोन येऊ लागले. तेही अव्याहतपणे; तेव्हा माझ्या लक्षात आलं की, हे पुस्तक भलतंच वाचकप्रिय होऊ लागलंय. अर्थात याचं बरंचसं श्रेय प्रकाशक श्री. शीतल मेहतांना द्यावं लागेल. चारशे रुपये किमतीचं पुस्तक फक्त पन्नास रुपयांत आणि तेही सचित्र. मग भले ती पेपरबॅक एडिशन का असेना ही काही सोपी गोष्ट नाही. वर्षभरात हजार प्रती खपवणं हे येरागबाळ्याचं काम नाही. ते श्री. मेहतांनी करून दाखवलं आहे. लायब्ररीत जाऊन पुस्तक वाचण्यासाठी घेऊन येण्यापेक्षा घरोघरी ग्रंथालयं व्हावीत, या कल्पनेनं झपाटलेल्या या कलंदर प्रकाशकानं पुस्तकविश्वात अक्षरश: क्रांती घडवून आणली आहे, असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

'मधुबाला' आवडली असं फोनवरून कळविणारे सुमारे नऊशे वाचक होते तर त्याच्या चौपट एस. एम. एस. माझ्या मोबाईलवर नोंद झाले आहेत; पण ही मंडळी एवढ्यावरच थांबली नाहीत तर त्यांनी मला निरनिराळ्या विषयांवर लिहिण्याची विनंती केली. अर्थात हे सारे विषय चित्रपटसृष्टीशी निगडित होते. वास्तविक मी सिनेसृष्टीवर लिखाण करणारा माणूस नव्हे. माझा व्यवसाय शल्यचिकित्सकाचा; पण माझं बहुतांशी लेखन ललित साहित्याशी निकटचं नातं असणारं. कथा, कादंबऱ्या आणि निवडक व्यक्तींची चरित्रं अशी माझी पंचवीस एक पुस्तकं प्रकाशित झाली. अनेक आघाडीच्या दिवाळी अंकांतून विविध विषयांवरचं माझं साहित्य प्रसिद्ध झालं आणि ते पुस्तकरूपातही प्रकाशित झालं; पण अवाक् करणारा प्रतिसाद मिळाला तो 'मधुबाला'ला. त्याच धर्तीवर मी एक वेगळा विषय निवडला आहे तो वाचकांनी सुचविल्यामुळंच.

'बॉन्ड... जेम्स बॉन्ड!' या विषयाचा अवाका मोठा आहे, अफाट आहे आणि अचाटही आहे. इंटरनेटवरून मी जमा केलेली माहिती १५००/१६०० पानांची आहे.

कारण मराठीच काय इंग्रजीतही जेम्स बॉन्डसंबंधी पुस्तकं मला कुठं सापडली नाहीत. म्हणून मी माझ्या अमेरिकेत स्थायिक झालेल्या कन्येला मृणालिनीला कळविलं. तिनं तिथले काही ग्रंथभांडार पालथे घातले आणि दोन संदर्भ ग्रंथ पाठवून दिले. नेटवर न मिळालेली; पण जास्ती रोचक आणि रंजक माहिती मला या ग्रंथांतून मिळाली. या सर्व माहितीचं परिशीलन करून मी माझ्या पद्धतीनं जेम्स बॉन्ड उभा केला आहे. गेल्या त्रेपन्न वर्षांत तेवीस बॉन्डपट प्रदर्शित झाले आणि ते सर्व चित्रपट प्रेक्षकप्रियही ठरले. साऱ्या जगातून बॉन्डपटांना जेवढा प्रतिसाद मिळाला तितका अन्य कोणत्याही चित्रपटाला मिळाला नसेल.

जगाच्या पाठीवर असा देश नसेल जिथं बॉन्डपट पोहोचलाच नाही. बॉन्डपटांना जितका प्रेक्षकवर्ग लाभलाय तितका अन्य कोणत्याही चित्रपटाला लाभला नसेल. बॉन्ड मालिकेनं जेवढा गल्ला तिकीटबारीवर गोळा केलाय तेवढा गल्ला इतर कोणत्याही चित्रपटमालिकेनं गोळा केलेला नाही. याचा अर्थ असा नाही का की, बॉन्डपटात अशी काही जगावेगळी जादू असावी. ती जादू काय ती शोधताना मला बऱ्याच नावीन्यपूर्ण आणि रंजक गोष्टी कळाल्या त्या मी वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा केलेला हा अल्पसा प्रयत्न.

जेम्स बॉन्डवर सर्वंकष लिखाण करायचं ठरविलं तर हजार पानांचा ग्रंथसुद्धा अपुरा ठरेल. वाचकांच्या माथी असा ग्रंथ मारण्यापेक्षा त्यांना आवडेल अशी माहिती मी या छोट्याशा पुस्तकात अंतर्भूत केली आहे.

सहा अभिनेत्यांनी जेम्स बॉन्डची भूमिका आपापल्या परीनं साकार केली. त्यात जास्तीत जास्त यशस्वी कोण झालं? सर्वाधिक लोकप्रिय बॉन्ड कोण? सर्वाधिक प्रेक्षकप्रिय बॉन्डपट कोणता? बॉन्डपटांसाठी नायिकांची निवड कशा रीतीनं करण्यात आली? खलनायक निवडीमागचे निकष कोणते? इतरही अनेक पात्रं बॉन्डपटात दिसून आली. त्यांचं नेमकं स्थान काय होतं?

बॉन्ड कादंबऱ्या वा कथा कोणी लिहिल्या? त्या अक्षरसाहित्याचं रूपांतर रुपेरी पडद्यावर कुणी केलं बरं?

बॉन्डपटांची यंत्रणा एखाद्या मध्यम आकाराच्या देशाची असावी तशीच होती. त्याचं अर्थकारण जगातल्या बऱ्याच देशांच्या अर्थकारणापेक्षा जास्ती बळकट आणि बलवत्तर होतं. बॉन्डपटांची जडणघडण एखाद्या अवाढव्य सर्कशीपेक्षा अनेक पटीनं मोठी होती. ही क्लिष्ट आणि किचकट यंत्रणा हाताळण्यासाठी हजारो हातांची जरुरी होती. या हजारो हातांनी हा जगन्नाथाचा रथ यशस्वीपणे ओढला, म्हणून तर बॉन्डपट इतके यशस्वी आणि प्रेक्षकप्रिय झाले.

या पुस्तकात मी आजवर प्रदर्शित झालेल्या प्रत्येक बॉन्डपटांचा सारांश दिला आहे. भारतीय प्रेक्षकांना इंग्रजी चित्रपटाची कथा नीटशी समजतेच असं नाही. कारण त्यातील पात्रांचे इंग्रजी संवाद बऱ्याचदा डोक्यावरून जातात. त्यामुळं कथेतील काही धागे निसटून जातात. माझं उच्च शिक्षण अमेरिकेत झालंय तरीदेखील काही वेळा मलासुद्धा काही संवाद नीटसे उमगत नाहीत; पण कथा थोडक्यात माहीत असेल तर ही अडचण बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकते. त्यामुळेच असेल, कदाचित बऱ्याच चित्रपटांतील पात्रांची संभाषणं चित्राच्या खालच्या भागात अक्षरबद्ध केलेली असतात; पण ती वाचताना पात्रांच्या हालचाली आपल्या नजरेतून निसटू शकतात. म्हणजे थोडक्यात काय चित्रपटकथेचे धागे नीटसे जोडता येत नाहीत. म्हणून मी प्रत्येक बॉन्डपटाची कथा संक्षिप्तपणे दिलेली आहे. कथा सविस्तर देणं विस्तारभयास्तव शक्य झालेलं नाही. त्याबद्दल मी वाचकांची क्षमा मागतो.

नायक, नायिका, खलनायक आणि इतर काही महत्त्वाची पात्रं निवडण्यासाठी निर्माते आणि दिग्दर्शकांनी किती कष्ट घेतलेत ते पुस्तक वाचल्यानंतर वाचकांना उमजेलच. त्या पात्रांची पडद्यामागची माहिती मी मुद्दामच नमूद केली आहे.

बऱ्याच चित्रपटरसिकांचा असा समज आहे की, हे सारे बॉन्डपट हॉलिवूडमध्ये तयार करण्यात आले आहेत. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. हे सारे चित्रपट इंग्लंडमध्ये तयार झाले आहेत; मात्र जरूरीप्रमाणे चित्रपटांची बाह्य चित्रणं मात्र अमेरिकेसह जगाच्या पाठीवरील अनेक देशांत झालेली आहेत. त्यात भारताचाही समावेश आहे. बॉन्डपट इंग्लंडमध्ये का बनले याचा ऊहापोह पुस्तकात सविस्तरपणे केलेला आढळेल.

जेम्स बॉन्डला शब्दरूप दिलं ते इयॉन फ्लेमिंग या इंग्लिश लेखकानं. हे एक काल्पनिक पात्र आहे, असं म्हणणं म्हणजे फ्लेमिंगच्या व्यक्तिमत्त्वावर अन्याय करण्याजोगं आहे. फ्लेमिंग हा स्वत:च एक रसिक आणि रंगेल माणूस होता. तो चांदीचा चमचा घेऊन जन्माला आला. त्यानं आयुष्याचं सोनं केलं. ते सारं आयुष्य त्याच्या कलाकृतीत प्रतिबिंबित झालं. फ्लेमिंग हा बॉन्डसारखाच जगला. मद्य, मदिराक्षी आणि अनेक मोहांच्या आहारी तो गेला आणि या साऱ्यांचा अतिरेक झाल्यामुळं तो साठी गाठण्याच्या आत जगातून चालता झाला; पण जेम्स बॉन्डला पडद्यावर साकारणारे सहा अभिनेते मात्र दीर्घायुषी झाले. कारण पडद्यावर साकारलेल्या बिनधास्त, बेदरकार आणि बेफिकीर व्यक्तिमत्त्वाची सावली त्यांनी आपल्या जीवनावर कधीही पडू दिली नाही. सत्य आणि स्वप्न यांची त्यांनी कधी गल्लत होऊ

दिली नाही. प्रत्यक्ष आणि प्रतिमा यांना परस्परांवर मात करू दिली नाही. फ्लेमिंगच्या विविधरंगी आणि विविधढंगी जीवनापासून कलेच्या प्रांगणात चमचमणाऱ्या ताऱ्यांनाच नव्हे, तर सर्वसामान्य माणसालाही शिकण्याजोगं खूप काही आहे.

इंद्रधनुष्याची स्वप्नं जरूर पाहावीत; पण त्या स्वप्नांवर स्वार होण्यापूर्वी हजार वेळा विचार करावा. आशाआकांक्षा जरूर असाव्यात; पण त्या आवाक्यातल्या असाव्यात. महत्त्वाकांक्षा आटोक्यात ठेवल्या नाहीत, तर त्या आपला बळी घेतात याची जाणीव सतत मनाशी बाळगली तरच जीवन सफल आणि समृद्ध होऊ शकेल. 'जेम्स बॉन्ड'कडून इतकं शिकलं तरी ते पुरेसं आहे.

जेम्स बॉन्डला शब्दबध्द केलं ते इयॉन फ्लेमिंग या ब्रिटिश लेखकानं; पण त्याला रुपेरी पडद्यावर आणलं ते हॅरी साल्ट्झमन आणि अल्बर्ट ब्रोकोली या निर्मात्याद्वयीनं. हॅरी हा कॅनडाचा नागरिक तर अल्बर्ट हा इटलीचा माणूस; म्हणजे जेम्सच्या जडणघडणीत तीन देशांचा हातभार लागला असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये.

बॉन्डच्या तेवीस चित्रपटांत अक्षरश: शेकडो पात्रं होती, हजारोसुद्धा म्हणता येईल. या पात्रांच्या भूमिका करणारी मंडळी पृथ्वीवरील सहा खंडांतून आणि अनेक देशांतून आलेली होती. पडद्यामागील कर्मचारी तर अगणित होते. म्हणजे बॉन्डची जडणघडण करण्यात साऱ्या जगाचाच हातभार आहे असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही.

बॉन्डपटांचं बहुतांशी चित्रीकरण इंग्लंडमध्ये झालं असलं तरी आऊटडोअर शूटिंगसाठी निवडलेली स्थळं पृथ्वीच्या पाठीवरील अनेक देशातली होती. इतकंच नव्हे, तर बाह्य चित्रणासाठी बॉन्डकर्त्यांनी आकाशपाताळ एक केलं असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये. कारण आकाशातच नव्हे, तर अनंत अवकाशात बॉन्ड जितका सहजतेनं वावरतो तितकाच तो अथांग सागराच्या लाटांवर आणि समुद्राच्या पोटात खोलवर त्याच्या विविध लीला पार पाडताना दिसतो. म्हणूनच म्हणावं लागेल की, जेम्स बॉन्ड अवघा विश्वमय होऊन गेलेला दिसतो.

निर्मात्यांविषयी सविस्तर माहिती मी पुस्तकात दिलेली आहेच. दिग्दर्शकांसंबंधात बोलायचं झालं तर पहिल्या दोन दिग्दर्शकांविषयी विशेष माहिती मी पुस्तकात सविस्तरपणे दिली आहे. ते दोन दिग्दर्शक म्हणजे टेरेन्स यंग आणि गाय हॅमिल्टन. तिसरा दिग्दर्शक कुविस गिल्बर्ट हादेखील निष्णात दिग्दर्शक होता. शिवाय तो एक चांगला लेखक आणि निर्माताही होता. आधीच्या दोन दिग्दर्शकांनी आखलेल्या मार्गावरून तो फार भरकटलाही नाही आणि त्याचं अंगभूत कौशल्य दाखविण्यातही तो कुठं कमी पडला नाही. त्यानंतर पीटर हंटची निवड झाली. पहिल्या

सहा बॉन्डपटांचं संकलन त्यानं अत्यंत नेटकेपणानं केलं होतं म्हणून तर त्याला 'ऑन हर मॅजेस्टिज सिक्रेट सर्व्हिस' या बॉन्डपटाचं दिग्दर्शन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आलं. त्याचं आगळंवेगळं वैशिष्ट्य सांगायचं झालं तर ते म्हणजे छायाचित्रण चालू असताना तो कधीही कॅमेरामनला थांबवायचा नाही. बरेच दिग्दर्शक संकलनाचा भाग सोपा करण्यासाठी छायाचित्रणात वेळोवेळी अडथळे आणतात; पण त्यामुळं होतं काय की, काही चांगली दृश्यं कारण नसताना आधीच चित्रपटातून वगळली जातात. दृश्य वगळण्याचं काम संकलकावर सोपवावं असं त्याचं मत होतं. त्याला नंतर मान्यता मिळाली. पुढं इतर अनेक दिग्दर्शक त्याचंच अनुकरण करू लागले.

जॉन ग्लेन हा चौथा दिग्दर्शक. त्यानं आधीच्या आठ बॉन्डपटांसाठी साहाय्यक दिग्दर्शक, संकलक आणि कलादिग्दर्शक अशी कामं केली होती. त्याचा प्रदीर्घ अनुभव ध्यानात घेऊन निर्मात्यांनी त्याला 'फॉर यूवर आईज ओन्ली' या बॉन्डपटासाठी दिग्दर्शनाची सूत्रं दिली. त्याच्या निराळ्या आणि स्वतंत्र शैलीमुळं त्याला पाच बॉन्डपट दिग्दर्शनासाठी बहाल करण्यात आले. इतर कोणत्याही दिग्दर्शकानं इतके बॉन्डपट केले नव्हते. त्यामुळं समीक्षकांनी त्याच्या चित्रपटांना 'स्पेशल ग्लेन स्टाईल' अशा उपाधीनं गौरवलं.

पियर्स ब्रॉसनान यानं नवा बॉन्ड म्हणून बॉन्ड वर्तुळात प्रवेश केला. या नव्या अभिनेत्याला बॉन्डच्या भूमिकेत चपखल बसविण्यासाठी मार्टिन कॅम्पबेल या नामवंत दिग्दर्शकाला पाचारण करण्यात आलं. 'गोल्डन आय' या बॉन्डपटाचं त्यानं अक्षरश: सोनं केलं. त्या चित्रपटानं विक्रमी गल्ला गोळा केला आणि ब्रॉसनाननं बॉन्डच्या भूमिकेचं सोनं केलं. कॅम्पबेलनं नंतर 'दि मास्क ऑफ झोरो' आणि 'व्हर्टिकल लिमिट'सारखे चित्रपट आपल्या दिग्दर्शन कौशल्यानं गाजविले. त्यामुळं 'डॅनियल क्रेग'चा बॉन्डपटात प्रवेश होताच निर्मात्यांना पुन्हा एकदा आठवण आली कॅम्पबेलची. त्यानंही फ्लेमिंगच्या पहिल्यावहिल्या कादंबरीचं म्हणजे 'कॅसिनो रॉयल'चं दिग्दर्शन असं काही झकास केलं की, चित्रपटानं बॉन्डपटातला सर्वाधिक गल्ला गोळा करणारा बॉन्डपट म्हणून नावलौकिक मिळवला.

रॉजर स्पॉट्टीशवूड, मायकेल ॲप्टेड, ली तमाहोरी, मार्क फॉरेस्टर आणि सॅम मेंडेस या दिग्दर्शकांनीही काही बॉन्डपट दिग्दर्शित केले. ते सर्व आपापल्या परीनं यशस्वीही ठरले.

सॅम मेंडेस हा ब्रिटिश दिग्दर्शक. त्यानं दिग्दर्शित केलेला पहिलावहिला चित्रपट होता १९९९ सालचा 'अमेरिकन ब्युटी'. या चित्रपटानं एक नव्हे दोन नव्हे तर चक्क

पाच ऑस्कर पुरस्कार पटकावले. सर्वोत्तम दिग्दर्शक म्हणून मेंडेसलाही 'ऑस्कर'नं सन्मानित करण्यात आलं. इतकंच नव्हे, तर त्याला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून बॅफ्टा, गोल्डन ग्लोब आणि समीक्षकांची निवड अशा विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलं. नंतरही अनेक चित्रपटांच्या दिग्दर्शनासाठी त्याच्यावर वेगवेगळ्या पुरस्कारांचा वर्षाव झाला. त्याच्या कौशल्यावर भाळून केट विन्सलेटनं त्याच्याशी विवाह करून टाकला. हीच ती नटी जिनं 'टायटॅनिक' या गाजलेल्या चित्रपटात नायिकेची भूमिका करून प्रचंड पैसा आणि नाव मिळवलं. मेंडेसनं 'स्कायफॉल' हा बॉन्डपट कथानक सुमार असूनही आपल्या कौशल्यानं असा काही दिग्दर्शित केला की, चित्रपटानं पहिल्या महिन्यातच १००० दशलक्ष डॉलर्सचा गल्ला गोळा करून एक नवीन कीर्तिमान स्थापित केला.

'स्कायफॉल'चं नेत्रदीपक यश पाहून मायकेल विल्सन आणि बार्बारा ब्रोकोली या निर्मात्याद्वयीनं जॉन लोगान या बॉन्डपटांच्या प्रमुख पटकथा लेखकाला पुढच्या दोन चित्रपटांच्या पटकथा बनविण्यास सांगितलं आहे. इयॉन फ्लेमिंगच्या कथाकल्पना केव्हाच संपल्या आहेत. त्यामुळं काळाला साजेशा नव्या कथाकल्पनांचा समावेश करून नवे बॉन्डपट प्रेक्षकांना २०१५ आणि २०१६ साली पाहावयास मिळतील. कल्पना कागदावर उतरल्या नसल्यामुळे त्यांना बॉन्ड २४ आणि बॉन्ड २५ अशी नामाभिधानं तात्पुरती बहाल करण्यात आली आहेत. सुरुवातीला समीक्षकांनी नाकारलेला डॅनिएल क्रेगचा बॉन्ड नंतर उदंड लोकप्रिय झाल्यामुळं तोच आता बॉन्डच्या रूपात दिसणार आहे.

'परमेश्वराची कृपा म्हणून सॅम मेंडेस हा तेविसाव्या बॉन्डपटाला लाभला ते एक निष्णात दिग्दर्शक म्हणून. तो नसता तर 'स्कायफॉल'वर आकाश कोसळलं असतं; पण 'स्कायफॉल'वर आकाशातून पैशाचा आणि कौतुकाचा वर्षाव झाला,' असं डॅनिएल क्रेग अत्यंत आदरानं सॅमबद्दल बोलला. खुदा देता है तो छप्पर फाडके, या म्हणीचा त्याला प्रत्यय आला असावा.

सर्वांत यशवंत, कीर्तिवंत आणि धनवंत बॉन्ड म्हणून सीन कॉनरीचा उल्लेख केला जातो; पण २४ आणि २५ नंबरचे बॉन्डपट पडद्यावर अवतरले की, या सर्व उपाध्या डॅनिएल क्रेगच्या खात्यावर जमा होतील अशी चिन्हं दिसू लागलीत.

मात्र 'बेस्ट बॉन्ड टिल टुडे' असं नाव मिळवलेल्या सीन कॉनरीला त्याच्या सिंहासनावरून हटवणं ही काही साधीसोपी बाब नाही!

संगीत आणि संघर्ष या दोन गोष्टी चित्रपटाची अविभाज्य अंगं आहेत. या दोन गोष्टी नसतील तर चित्रपट रंजक आणि रोचकही होत नाही. हिंदी चित्रपटात तर